महावितरण

# जाहीर सूचना

**फक्त वर्धा विभाग कार्यक्षेत्रा मधील प्रशिक्षणार्थी करिता आय.टी.आय शिकाऊ उमेदवार अधिनियम 1961 अन्वये एक वर्ष (2024 ते 2025) करीता शिकाऊ उमेदवार म्हणून भरती प्रकिये संदर्भात**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री, तारतंत्री व कोपा या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सूचित करण्यात येते की, महावितरण वर्धा विभागाअंतर्गत सन 2024-2025 करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी खालील व्यवसायाकरीता करारबद्ध करण्यात येणार आहे. त्याकरिता पात्र उमेदवारांनी सदर **https://www.apprenticeshipindia.gov.in** संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता जाहिरात प्रकाशित झाल्यापासून दि. 31.10.2024 पर्यंत अस्थापना नोंदणी क्रमांक E05202702796 वर संगणक प्रणाली मधून अर्ज (Online Application) करावे. या पूर्वीचे व नंतरचे सर्व अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घावी.

**वीजतंत्री (Electrician) – 22 पदे, तारतंत्री (Wireman) – 22 पदे व कोपा (COPA) -12 एकुण 56 जागा**

**अटी व शर्ती: (1) शैक्षणिक अर्हता :-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उतीर्ण प्रमाणपत्र किवा तत्सम परीक्षा उतीर्ण आवश्यक व NCVT नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. **(2) वय मर्यादा :** 18 ते 30 वर्ष (मागासवर्गीयांसाठी 5 वर्ष शिथिलक्षम) (3) प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा राहील व विद्यावेतन नियमाप्रमाणे राहील. (4) भरती प्रक्रिया निगडीत सर्व अधिकार व्यवस्थापनाने राखून ठेवलेले आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविल्या जाणार नाही. (5) भरती प्रक्रीये दरम्यान उमेदवाराने राजकीय किवा इतर अधिकाऱ्यांकडून दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. (6) उमेदवार हे फक्त महावितरण वर्धा विभाग यांच्या कार्य क्षेत्रानांतर्गत रहिवाशी असल्यास उमेदवारी अर्ज ग्राह्य धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच वर्धा जिल्ह्यातील अधिवास (Domicle) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (7) या जाहिरातीच्या पूर्वीचे अर्ज व दि. 31.10.2024 नंतरचे कोणतेही अर्ज ग्राह्य धरल्या जाणार नाही. उमेदवाराने online अर्ज करतांना पोर्टलवर मूळप्रमाणपत्रे योग्यरीत्या अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच के.वाय सी करणे आवश्यक आहे. (8) शिकाऊ उमेदवाराची निवड हि दहावी व आय.टी.आय यांच्या सरासरी गुणांच्या टक्केवारी प्रमाणे व वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रवर्ग निहाय निवड केली जाणार आहे.

**अर्ज करतांना खालील कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.**

(1) एस.एस.सी. गुणपत्रिका व सनद प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी. (2) आय.टी.आय उत्तीर्ण गुणपत्रिका (चार सेमिस्टर) व सर्व प्रमांणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी. (3) उमेदवाराने मागास प्रवर्गातून अर्ज केला असल्यास जात प्रमाण पत्राची प्रत जोडावी. (4) वर्धा जिल्ह्यातील अधिवास (Domicle) प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.

गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची यादी **दि. 11.11.2024** रोजी कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. संवसु विभाग प्रशासकीय इमारत बोरगाव नाका वर्धा ता. वर्धा जिल्हा. वर्धा कार्यालयात लावण्यात येईल तसेच निवड झालेले प्रशिक्षणार्थी यांच्या Mail ID वर पाठविण्यात येईल. निवड झालेले प्रशिक्षणार्थी यांनी वर्धा विभागीय कार्यालयामध्ये संपूर्ण मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र सह तपासणी करिता व त्यासोबत छायांकित प्रतीचा एक संच घेऊन **दिनांक 18.11.2024 रोजी सकाळी 11.00 वाजता** उपस्थित राहावे. वेळेवर सदर प्रकीयेत बदल करण्याचा अधिकार संबंधीत कार्यालयाचे सक्षम अधिकाऱ्यास राहतील.

**कार्यकारी अभियंता,**

**म.रा.वि.वि.क. मर्या.,संवसु विभाग वर्धा**